संकीर्ण

# ‘पाचौली’ लागवडीतून मिळवा नफ्याचा सुगंध!



**दर्शना मोरे**
सहायक प्राध्यापक
(मो.नं.९६८९२१७७९०)
क.का. वाघ उद्यानविद्या
महाविद्यालय, नाशिक




पाचौली पिकाच्या चांगल्या वाढीसाठी सुरुवातीपासूनच खुरपण्या करून तणवाढ नियंत्रित करणे आवश्यक आहे. दोन ओळींमध्ये हलकी मशागत करून जमीन भुसभुशीत ठेवावी. कमी पर्जन्यमान असणाऱ्या प्रदेशात सिंचनाची सोय असली पाहिजे. लागण केल्यानंतर सुरुवातीचे ४-५ दिवस दररोज पाणी द्यावे. त्यानंतर १५-२० दिवसाआड पाणी द्यावे. वाढ चांगली झाल्यानंतर तीन दिवसांतून एकदा पाणी दिले जाते. या पिकास सातत्याने सिंचन व्यवस्था असणे सोयीचे ठरते.

**पा**चौली (Pogostemon cablin Benth) ही Lamiaceae या कुळातील महत्त्वपूर्ण सुगंधी वनस्पती आहे. पाचौलीपासून काढले जाणारे तेल मौल्यवान अत्तरांमध्ये त्यांचा दर्जा व गुणधर्म दीर्घकाळ टिकवण्यासाठी उपयोगी पडते. पाचौली तेल मूलतः सुगंधी द्रव्य असल्याने त्याचा वापर अत्तरे, साबण, सौंदर्यप्रसाधने व स्वादजन्य पदार्थ निर्माण करणाऱ्या उद्योगांमध्ये होतो. इंडोनेशिया व चीन या देशांचा पाचौली तेलाचा नियमित पुरवठा करणाऱ्या देशांमध्ये समावेश होतो. परदेशातून आयात करून या तेलाची देशांतर्गत गरज भागवली जाते. या सुगंधी तेलाचे महत्त्व व मागणी पाहता कोकण किनारपट्टी भागात, विशेषतः नारळ बागांत लागवडीस मोठ्या संधी आहेत.

**वनस्पती परिचय** : पाचौली झुडूपवर्गीय वनस्पती असून उंची सावलीत सुमारे १ ते १.५ मी. पर्यंत वाढते. या वनस्पतीच्या चौरस आकार खोडांवर अनेक फांद्या असतात. सावलीतील पानांचा रंग तजेलदार हिरवा; तर मुख्य पीक म्हणून घेतल्यास फिकट जांभळट हिरवा असतो. आपल्या देशात या झाडांना फुले येत नाहीत. परंतु निसर्गत: जंगलात आढळणाऱ्या झुडुपांना जानेवारी- फेब्रुवारी महिन्यात फुले येतात. सुधारित जाती- जाहोर (उत्तम दर्जाचे सुगंधी तेल) सिंगापूर, इंडोनेशिया (अधिक तेल उत्पादन).

**जमीन व हवामान** : पाचौली पीक सहनशील





असल्याने ते विविध जमीन प्रकारात उत्पादन देते. परंतु खोल, पोयटा, उत्तम निचऱ्याच्या व समृद्ध सेंद्रिय द्रव्ये तसेच अन्नद्रव्ये असणाऱ्या जमिनीत उत्पादन चांगले मिळते. जमिनीचा सामू ५.५ ते ६.५ या दरम्यान असल्यास लागवडीसाठी आदर्श मानला जातो. सुपीक जमिनीत या पिकाचे २-३ हंगाम मिळतात. हवामानाचा विचार करता उबदार व दमट हवामान पिकास चांगले मानवते. या पिकाची लागवड प्रतिवर्षी १५० ते ३०० सें.मी. समान विखुरलेल्या पर्जन्यमान प्रदेशात यशस्वीरित्या केली जाऊ शकते. या पिकासाठी २४-२८ से. तापमान व सरासरी आर्द्रता ७५% आदर्शवत मानली जाते. या पिकाची लागवड समुद्रसपाटीपासून ८०० ते १००० मी. पर्यंत यशस्वीरीत्या केली जाऊ शकते. कमी पर्जन्यमान असणाऱ्या प्रदेशात सिंचन व्यवस्था करून लागवड करता येईल.

**पूर्वमशागत** : पाचौली लागवडीपूर्वी जमिनीची चांगली पूर्वमशागत होणे आवश्यक आहे. जमीन चांगल्या प्रकारे नांगरून, कुळवून घ्यावी. काडीकचरा वेचून शेत स्वच्छ करून घ्यावे. एक हेक्टर क्षेत्रासाठी १२ टन शेणखत वापरावे. पिकाचे सूत्रकृमीमुळे मोठे नुकसान होते. त्यासाठी लागवडीपूर्वी प्रतिहेक्टरी २० किलो phurdon / nimagon सारखे अन्य रसायन जमिनीत योग्य रीतीने मिसळावे. जमीन तयार झाल्यानंतर ६० सें.मी. अंतरावर २५ सें.मी. उंच व २०-२२ सें.मी. रुंद सरी- वरंबे तयार करावेत.

**अभिवृद्धी व लागवड** : पाचौलीची लागवड ४-५

पेरण्यांच्या (१५-२० सें.मी.) छाटकलमापासून रोपवाटिकेत तयार केलेल्या रोपांपासून करतात. निवड केलेल्या छाटकलमाच्या पानांच्या २-३ जोड्या काळजीपूर्वक काढून टाकाव्या व पॉलिथिन पिशवी/ मडक्यामध्ये लागवड करावी. त्यापूर्वी छाटकलमाच्या खालच्या बाजूस तिरका काप देऊन छाटकलमांना चांगल्या मुळ्या फुटण्यासाठी ५०० पी.पी.एम.- आय.बी.ए. /१००० पी.पी.एम.- आय.ए.ए./ १५०० पी.पी.एम.- एन.ए.ए. या संजीवकांची प्रक्रिया करावी. प्रक्रिया केलेली छाटकलमे २-३ सें.मी. अंतरावर गादीवाफ्यावर लावली तरी चालतात. रोपवाटिकेसाठी सावलीची व्यवस्था करून झारीने नियमित पाणी द्यावे. ४-५ आठवड्यांत छाटकलमांना मुळे फुटण्यास सुरुवात



होते व ८-१० आठवड्यात पुनर्लागवडीसाठी रोपे तयार होतात. लागवड करण्याच्या अगोदर तयार केलेल्या सरी-वरंब्यास पाणी देऊन जून- जुलै महिन्यात रोपांची ६० X ६० सें मी. अंतरावर पुनर्लागवड करावी. पाचौलीचे पूर्ण वाढलेले झुडूप १२५ सें.मी. पर्यंत उंच वाढते. पाचौली लागवडीस सावली मानवते म्हणून या पिकाचे नारळ/ सुपारी इ. बागांमध्ये आंतरपीक घेतले जाते. ज्या ठिकाणी अशी आंतरपिके घेण्याची सोय नसते तेथे ग्लिरिसिडीया/ पांगरा इ. झाडांची लागवड करून सावलीची सोय केली जाते.

**आंतरमशागत आणि पाणी व्यवस्थापन :** पाचौली पिकाच्या चांगल्या वाढीसाठी सुरुवातीपासूनच खुरपण्या करून तणवाढ नियंत्रित करणे आवश्यक आहे. दोन ओळींमध्ये हलकी मशागत करून जमीन भुसभुशीत ठेवावी. कमी पर्जन्यमान असणाऱ्या प्रदेशात सिंचनाची सोय असली पाहिजे. लागण केल्यानंतर सुरुवातीचे ४-५ दिवस दररोज पाणी द्यावे. त्यानंतर १५-२० दिवसाआड पाणी द्यावे. वाढ चांगली झाल्यानंतर तीन दिवसांतून एकदा पाणी दिले जाते. या पिकास सातत्याने सिंचन व्यवस्था असणे सोयीचे ठरते.

**खते :** पुनर्लागवडीपूर्वी प्रतिहेक्टरी ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाशसह २५ किलो नत्र जमिनीत मिसळावे. लागवडीनंतर १२५ किलो नत्र ५ समान हफ्त्यांत विभागून (२५ किलो) प्रत्येक कापणीनंतर व दोन महिन्यांनी द्यावे. अशा प्रकारे प्रतिहेक्टरी प्रतिवर्षी १५० किलो नत्रखत या पिकास द्यावे लागते.

**कापणी व उत्पादन :** पाचौली पिकाची पहिली कापणी लागवडीनंतर ५-६ महिन्यांनी पाने फिकट हिरवी- तपकिरी झाल्यानंतर केली जाते. नव्या व मजबूत फांद्या झाडावर कायम ठेवून शेंड्याची छाटणी केली जाते. छाटणी करण्यासाठी धारदार सिकेटर वापरावा. पिकाच्या व्यवस्थापनानुसार पुढील कापण्या ३-४ वर्षांपर्यंत दर ३-४ महिन्यांनी केल्या जातात. पिकाची कापणी सुगंधी तेलाचा नाश टाळण्यासाठी सकाळी व सायंकाळी करावी. कापणी करताना ३ पक्व पानांच्या जोड्या असणाऱ्या २५-५० सें.मी. जोमदार फांद्यांची निवड करावी. काही फांद्या झाडाच्या भविष्यातील जोमदार/ उत्पादनक्षम वाढीसाठी झाडावरच ठेवल्या जातात. कापणीनंतर शेंडे व पाने पातळ थरामध्ये सावलीत वाळवितात. वाळविताना पाने कुजणार नाहीत याची काळजी घ्यावी. सर्वसाधारणपणे पाने सुकविण्यास ३ ते ५ दिवस लागतात. तेलाचा चांगला दर्जा व उत्पादनासाठी पाने वाळविण्याची प्रक्रिया योग्य होणे आवश्यक ठरते. पानांचे कुजणे टाळण्यासाठी त्यांचा थर अधून मधून हलवून वरचा थर खाली करून घ्यावा. त्यानंतर संपूर्ण पाने व शेंडे दाब देऊन- गाठी बनवून थंड व कोरड्या जागेत उर्ध्वपातनासाठी साठवावीत. प्रतिवर्षी प्रतिहेक्टरी दोन टन सुकलेल्या पानांचे/ शेंड्यांचे उत्पादन मिळते. ■